## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची साक्ष

## निशाणी क्र. १६

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| नाव | – | देविदास ढोमण बोरसे, |
| वय | – | ६१ वर्षे, |
| व्यवसाय | – | सेवानिवृत्त शिक्षक, |
| सध्या नेमणुक | – | प्लॉट नं. २८, हुडको कॉलनी, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे. |

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे. एस. गंगावणे यांचे मार्फत.**

०१. फिर्यादी मथुराबाई हया माझ्या सासुबाई लागत. आरोपी नारायण हे माझे शालक आहेत. घटना दि. २०.०२.२०२० रोजीची आहे. मी पुन्हा सांगतो की, घटना दि. ०५.०२.२०२० रोजीची आहे. सासुबाई हया बऱ्याच दिवसांपासुन शालक नारायण यांच्याकडे होती. एकेदिवशी सायंकाळी ०६.०० ते ०६.३० च्या दरम्यान तेथीलच एका शेजाऱ्याने मला फोन केला. मला त्या शेजाऱ्याचे नाव आठवत नाही. त्याने मला फोनवर सांगितले की, 'तुमच्या सासुबाई घरी एकटया आहेत, शालक घरी नाही आणि त्यामुळे तुम्ही लवकर इकडे या'. तेथे जावुन पाहिले असता सासुबाई हया घरात एकटया होत्या. शेजाऱ्यांनी वगैरे हाका मारल्या असता काही आवाज येत नव्हता. शेजाऱ्याचे नाव वाजिद पठाण असे होते. तसेच गावातील बऱ्याच लोकांची गर्दी होती. आवाज दिला असता समोरुन म्हातारीचा काही आवाज आला नाही. आम्हाला देखील कल्पना नव्हती की, म्हातारी एकटी असुन तो कुठेतरी गावाला जात आहे.

०२. त्यानंतर गावकऱ्यांनी पोलीसांना फोन केला. त्यांनी कुलुप तोडले व म्हातारीला बाहेर काढले. बाहेर काढला असता म्हातारीची परिस्थिती नाजुक होती. दार वगैरे बंद असल्याने जीव गुदमरल्याची शंका आली. तिला पाणी वगैरे दिले. त्यानंतर पोलीसांनी कारवाई

केली. पोलीसांनी तब्येत बरी नसल्याने म्हातारीला हॉस्पिटलला घेवुन जावे लागेल असे सांगितले व त्याप्रमाणे तिला नेण्यात आले. म्हातारीला दोन ते तीन दिवस सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. तेथे तिच्यावर उपचार झाले. पोलीसांनी सदर घटनेबाबत माझा जबाब नोंदविला होता. माझा जबाब त्याच दिवशी ०५.०२.२०२० रोजी घेतला होता.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. जे. पी. कुवर यांचे मार्फत.</u>**

०३. पोलीसांनी दि. ०५.०२.२०२० रोजीचा असा माझा एकच जबाब नोंदविला होता. सदर जबाब मी पाहिला व वाचला होता. हे म्हणणे खरे आहे की, ०५.०२.२०२० रोजीचा जबाब अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे आहे की, "त्याने मला फोनवर सांगितले की, 'तुमच्या सासुबाई घरी एकटया आहेत, शालक घरी नाही आणि त्यामुळे तुम्ही लवकर इकडे या''’ही बाब आज रोजी मी प्रथमच कथन करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व नारायण चौधरी यांच्यामध्ये अनेक वर्षापासुन कौटुंबिक कारणांवरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या वादामुळे मी आजी वारल्यानंतर दशक्रिया विधीकरीता देखील नारायण चौधरी यांच्याकडे गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याचप्रमाणे व त्याच कारणाकरीता माझी पत्नी प्रमिलाबाई ही देखील दशक्रिया विधीकरीता गेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, गॅलरीचा दरवाजा हा हवा उजेड येण्याकरीता म्हणुन सळयांनी आच्छादलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर गॅलरीचा दरवाजा व घराचा दरवाजा यांच्यामधील परिसर साधारणपणे ६×९ फुटाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रॅलीमध्ये मथुराबाई उभी होती व माझे तिच्याशी बोलणे झाले होते. त्यावेळेस इतर लोक तिच्याशी बोलत होते किंवा कसे याबाबत मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोंडाईचा येथे चोऱ्यांचे प्रमाणे खुप असल्याने साधारणपणे प्रत्येक घरास घराचा मुख्य दरवाजा व त्याच्याबाहेर लोखंडी दरवाजा बसविला आहे. हे म्हणणे खरे आहे की, लोखंडी दरवाजा याकरीता लावलेला असतो की, आतील व्यक्ती तो दरवाजा आतुन उघडुही शकतो व लावुही शकतो. हे म्हणणे खरे आहे की, घरातील व्यक्ती काम करत असेल आणि कुठे जावुन यायचे असेल तर बाहेरुन लोखंडी दरवाजा लावुन जात असतात. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना

घडलेली नसतांना कौटुंबिक वादातुन खोटा जबाब देवुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2025.12.09 12:54:50 +0530

दिनांक : ०८/१२/२०२५　　(आदित्य घ. नाईक)
स्थळ : दोंडाईचा　　न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – जी. एस. अहिरे,

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. – ०९.१२.२०२५.

स्वाक्षरित/–
लघुलेखक (श्रेणी–३)